## शुक्रवार दिनांक ३०/०७/२००९ रोजी निमा हाऊस, सातपूर, नाशिक-७ या ठिकाणी दुपारी ४.०० वाजता झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती व जिल्हा सल्लागार समितीच्या सभा क्रमांक १/२ चे इतिवृत्त.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

विषय क्र.१ः- मागील सभा दिनांक ०४/०६/०९च्या सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

सदरचे इतिवृत्त सदस्य सचिव यांनी सभागृहात वाचून दाखविले असता त्यावर कोणाचीही हरकत नसल्यामुळे ते सर्वानुमत्ते मंजुर करुन कायम करण्यांत आले.

**विषय क्र.२ः- मागील सभेच्या इतिवृत्तावरील केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेः-**

**१. नाशिक महानगरपालिका यांचेशी निगडीत समस्या :-**

अ) सातपूर-अंबड परिसरातील अतिक्रमणे हटविणे बाबत :-

चर्चा /ठराव -- सदर बाबतीत एमआयडीसीच्या अधिका-यांनी अंबड क्षेत्रातील जी अतिक्रमणे हटविली त्याबाबत सविस्तर माहिती दिली असता मा.अध्यक्षांनी उपस्थित औद्योगिक संघटनांच्या प्रतिनिधिंशी चर्चो करुन सांगितले की, सातपूर व अंबड क्षेत्रामध्ये अतिक्रमणे होणारच नाहीत अशी दांडगी इच्छा शक्ती सयुक्त मोहिम राबविणा-या सर्व यंत्रणांच्या अधिका-यांनी मनात ठेवून सदरची मोहिम या क्षेत्रामध्ये पुन्हा पुन्हा राबविण्यांत येवून कार्यवाही करावी. तसेच जप्त केलेल्या टप-या, झोपडया व साहित्य संबंधीतांना परत करण्यांत येवू नये. सदरची मोहिम राबवितांना एमआयडीसीला मनपा व पोलिस विभागाने आवश्यकते पूर्ण सहकार्य करावे.

कार्यवाही :- प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी / उप आयुक्त (कर) मनपा / सातपूर व अंबड पोलिस विभाग, नाशिक.

**२) औद्योगिक परिसरातील होत असलेल्या वाढत्या चो-या बाबत :-**

औद्योगिक परीसरात शुक्रवारी व शनिवारी भारनियमनामुळे विद्युत पुरवठा बंद राहतो त्यामुळे सदरच्या चो-या होत असतात.त्यासाठी भारनियमनाच्या कालावधीत सातपूर व अंबड एमआयडीसी क्षेत्रामध्ये किमान रात्री पथदिवे सुरु ठेवण्यासाठी स्ट्रिट लाईट करीता स्वतंत्र विज वाहीन्या टाकल्या शिवाय सदरचा प्रश्न सुटू शकत नाही व हा विषय धोरणात्मक असल्यामुळे वरीष्ठ कार्यालयाकडे पाठविलेला आहे असे अधिक्षक अभियंता, मराविविकं लि. नाशिक यांनी सांगितले असता सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. चर्चेअंती मा.अध्यक्षांनी सांगितले की, मराविवि कंपनीने त्यांचे स्तरावरील कार्यवाही सुरु ठेवावी, दरम्यान सदरच्या कामासाठी अपेक्षित २० कोटी रुपये खर्च मनपाकडून करता येईल काय किंवा त्याच रक्कमेत सोलर स्ट्रिट लाईट मनपा मार्फत बसविता येतील किंवा कसे याबाबत मनपाने पडताळणी करुन सविस्तर अहवाल समितीस पाठवावा.तसेच उपरोक्त क्रमांक १ व २ च्या संदर्भात कायमस्वरुपी उपाय योजना करणेबाबत काय करता येईल याबाबत चर्चा करणेसाठी निमा संघटनेने आयुक्त, मनपा/ पोलीस आयुक्त / एमआयडीसीचे अधिकारी यांची संयुक्त सभा आयोजित करावी.

कार्यवाही -- अधिक्षक अभियंता, मराविवि, कंपनी लि.,/ उपाआयुक्त (कर) मनपा, कार्यकारी अभियंता, एमआयडीसी.

**३) महानगरपालिका जकात नियमावली बाबत (अनामत रक्कम):-**

सदर बाबतीत उपस्थित औद्योगिक संघटनांच्या प्रतिनिधींनी कोणतीही अडचण नसल्याचे सांगितल्याने सदरचा विषय वगळण्यांत यावा असे मा.अध्यक्षांनी सांगितले.

**४) नाईस एरियातील उद्योग घटकांना बीसीसी मिळणे बाबत :-**

सदर बाबतीत उपस्थित एमआयडीसीच्या अधिका-यांनी सांगितले की, नाईस या संस्थेच्या सर्वेच अडचणी / प्रश्नां बाबत आजच मा. सह मुख्य कार्यकारी अधिकारी , एमआयडीसी, मुंबई यांचे कडे होणा-या सभेत चर्चा होणार आहे. सदर सभेस प्रादेशिक अधिकारी व कार्यकारी अभियंता गेलेले असून सभेतील निर्णया बाबतचा सविस्तर अहवाल लवकरच समितीस सादर केला जाईल.

कार्यवाही –प्रादेशिक अधिकारी, / कार्यकारी अभियंता, मऔविम, नाशिक.

**५) सचिव, निमा यांना म.औ.वि.म. च्या अधिका-यांकडून वैयक्तिक आकसा पोटी त्रास होत असल्याबाबत --**

सदर बाबतीत चर्चेच्या वेळी सचिव निमा सभागृहात नसल्याने या विषयावर चर्चा होवू शकली नाही.

कार्यवाही :- मा.उप जिल्हाधिकारी, (निवडणूक) नाशिक.

**६) भुखंड क्रमांक २८ एमआयडीसी, सातपूर येथील (फ्लॅटेड) इमारतीमधील गाळे धारकांच्या समस्या बाबत.**

सदर बाबतीत एमआयडीसीच्या अधिका-यांनी मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी जो रुपये ५.५० लाखाचा प्रस्ताव मंजूर करुन आणला त्याबद्ल्ल निमा चे अध्यक्ष, श्री. रमेश वैश्य यांनी संबंधीत अधिका-यांचे अभिनंदन केले. यावर मा.अध्यक्षांनी सांगितले की, पुढील कार्यवाही एमआयडीसीच्या अधिका-यांनी तात्काळ सुरु करावी. तथापी मनपाने सुध्दा त्यांचेशी संबंधीत दैनदिंन सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात. तसेच संबंधीत गाळे धारकांनी सुध्दा एमआयडीसीला आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करुन देणे बाबत वेळोवेळी सहकार्य करावे.

कार्यवाही :- प्रादेशिक अधिकारी, कार्यकारी अभियंता, उप आयुक्त, (कर), मनपा संबंधीत गाळे धारक नाशिक.

**७) रत्नदिप मेटल इंडस्ट्रिज, खतवाड, दिंडोरी, जि.नाशिक या घटकाचा अवाजवी बिनशेती कर आकारणी बाबतचा तक्रार अर्ज.**

सदरचा अर्ज योग्यत्या कार्यवाहीसाठी तहसीलदार दिंडोरी यांचेकडे जिल्हा उद्योग केंद्राने पाठवावा असे मागील सभेत ठरल्याप्रमाणे सदरचा अर्ज जिल्हा उद्योग केंद्राने दिनांक १६/०४/२००९ रोजी च्या पत्राव्दारे तहसिलदार दिंडोरी यांना कार्यवाही साठी पाठविलेला असून आजच्या सभेस त्यांना निमंत्रीत करण्यात आले आहे.अद्याप संबंधीतांकडून पूर्तेता अहवाल प्राप्त झालेला नाही.

**८) मे. कॉसमॉस इंडिया, भुखंड क्रमांक २५/१ एमआयडीसी, सातपूर, नाशिक येथील भूखंडा बाबतचे निवेदन.**

सदरचा विषय न्यायप्रविष्ठ आहे असे एमआयडीसीच्या अधिका-यांनी सांगितले असता तूर्ते सदरचा विषय इतिवृत्तातून वगळण्यांत यावा असे मा.अध्यक्षांनी सांगितले.

**९) मे.जोटो ॲब्रेसिव्हज प्रा.लि. सी-११/४३, रोड ए, नाईस ऐरीया, सातपूर नाशिक.-- अनियमित विद्यूत पुरवठयामुळे होणा-या नुकसान भरपाई संदर्भात मार्गदर्शन मागणे बाबतचा घटकाचा अर्ज दिनांक ०१/०४/२००९.**

सदर बाबतीत उपस्थित अर्जदार यांनी सविस्तर अडचणी सभागृहात विषद केल्या असता सविस्तर चर्चेअंती मा.अध्यक्षांनी सांगितले की, अधिक्षक अभियंता, व संबंधीत कार्यकारी अभियंता, मराविवि कंपनी लि. नाशिक यांनी सदर उद्योग घटकास संयुक्त भेट देवून पाहणी करुन कार्यवाही करावी व सदरचा प्रश्न पुढील सभेच्या आत सोडवून तसा लेखी अहवाल समितीकडे सादर करावा.

सिन्नर तालुका औद्योगिक सहकारी वसाहत मर्या, यांचे प्रश्न :-

**१) सिन्नर सहकारी औद्योगिक वसाहतीमध्ये सध्या नविन वीज कनेक्शन मिळत नाही त्याकामी जादा क्षमतेचे सबस्टेशन उभारण्याचे कामास वेग देणे बाबत..**

याबाबत ३३ केव्ही लाईन डबल सर्कीट माळेगांव ते मुसळगांव अंदाजे १२ कि.मी. ची लाईन मंजुर झालेली असून सदरचे काम प्रगती पथावर आहे. सदर काम पूर्ण झाल्यावर मे. बेलोटा कंपनी व इतर ग्राहकांना विज पुरवठा देण्यांत येईल असे अधिक्षक अभियंता (मंडल-ग्रा) नाशिक यांनी पत्र क्रमांक ४८७० दिनांक ३०/०७/२००९ अन्वये कळविले आहे असे सदस्य सचिव यांनी सांगितले असता सदर कामात गती आणावी असे मा.अध्यक्षांनी सांगितले.

कार्यवाही -- अधिक्षक अभियंता (मंडल-ग्रा) नाशिक.

**२) एम.एस.एफ.सी.ने जप्त केलेले उद्योग घटकांची विक्री करुन हस्तांतरण करतांना मुंबई कार्यालयाकडून होत असलेली दिरंगाई. त्यासाठी सद्याच्या स्पर्धेच्या काळात सुलभ कार्यपध्दतीने कामकाज करण्यासाठी सुचना करणे बाबत. :-**

याबाबत चर्चे मध्ये अध्यक्ष, निमा व व्यवस्थापक, नाईस यांनी संबंधीत यंत्रणांकडून (उदा. पमविम, पुणे) ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे बाबत येणा-या अडचणी सांगितल्या असता मा.अध्यक्षांनी सांगितले की, संबंधीत यंत्रणांना जिल्हा उद्योग केंद्राने पत्रव्यवहार करण्यासाठी निमा व नाईस संघटनेने सविस्तर पत्र जिल्हा उद्योग केंद्राकडे पाठवावे. तथापी उद्योग घटकांकडून ना-हरकत प्रमाणपत्र मागणी करणे बाबत एमआाडीसीने शासन निर्णया नुसारच मागणी करावी.

कार्यवाही – निमा / नाईस, नाशिक / प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नाशिक/ पमविम, पुणे / महावित्त, नाशिक.

**३) ट्रक टर्मीनल व डंपीग यार्ड, एमआयडीसी सिन्नर. :-**

सदर बाबतीत मा.अध्यक्षांनी सांगितले की, नाशिक व सिन्नर येथील ट्रक टर्मीनल व डंपीग यार्डच्या कांमाबाबत नुकत्याच नाशिक येथे झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकी मधील निर्णया नुसार आर्थीक तरतूद प्राप्त होण्याची शक्यता आहे तथापी सदर ठिकाणच्या जागां बाबत ज्या काही अडचणी असतील त्याबाबत प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, नाशिक यांनी वैयक्तिक लक्ष देवून त्या पुढील सभेच्या आत सोडवाव्यात.

कार्यवाही :- प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नाशिक.

## मालेगांव तालुका ग्रामीण यंत्रमाग समिती, मालेगांव, यांचेकडील प्रश्न :-

**विषय क्र.१ :-सायने गावा जवळच्या एमअयडीसी क्षेत्रातील भुखंड वाटप करणे बाबत तसेच सायने एमअयडीसी च्या विकासाबरोबर मोसम नदीच्या पश्चिम भागात दुसरी एमअयडीसी स्थापन व्हावी त्यासाठी प्राथमिक अहवाल तयार करणे बाबत.**

सदर बाबतीत एकूण ६४ भुखंड असून ३६ अर्ज प्राप्त झालेले आहेत त्यापैकी ३ भुखंड वाटप झालेले असून उर्वरीतांनी रक्कम भरणा केल्या नंतर पुढील कार्यवाही केली जाईल असे एमआयडीसीच्या अधिका-यांनी सांगितले असता मा.अध्यक्षांनी सांगितले सदर बाबतीत प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, नाशिक यांनी लक्ष देवून कामाची गती वाढवावी. तसेच मोसम नदीच्या पश्चिम भागात दुसरी एमआयडीसी स्थापन करणे बाबतचा प्राथमिक अहवाल बाबत सुस्पष्ट व सविस्तर माहिती लेखी स्वरुपात समितीकडे सादर करावी.

कार्यवाही :- प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक. व सायने औद्योगिक सहकारी वसाहत, मालेगांव.

विषय क्र. :- २

**मालेगांव औद्योगिक क्षेत्र मौजे सायने बु.ता.मालेगांव जि. नाशिक येथील खडीक्रेशर काढून टाकणेबाबत.**

सदर बाबतीत खडीक्रेशर साठी मा. जिल्हाधिकारी नाशिक यांचे कार्यालयाकडून खडी पट्टा (क्वारी लिज) मंजूर झालेले असल्याने संबंधीत घटकाने विज पुरवठा बंद करणे विरुध्द हरकत घेतलेली आहे. त्यामुळे सदरचे विज कनेक्शन बंद करता येवू शकत नाही तसेच मा. जिल्हाधिकारी, कार्यालय, नाशिक यांचेकडून सदर खडी क्रेशर धारकाचा खडीपट्टा रद् झाल्यास सदरचे विज कनेक्शन बंद करता येवू शकेल असे अधिक्षक अभियंता, (मंडल-ग्रा) नाशिक यांनी पत्र क्र.४८७० दिनांक ३०/०७/२००९ अन्वये कळविले आहे. असे सदस्य सचिव यांनी सांगितले असता मा. अध्यक्षांनी सांगितले की, एमआयडीसीने सदर ठिकाणी वस्त्रोद्योग पार्क विकसीत करण्याचे काम सुरु ठेवावे, संबंधीत घटकाचा खडीपट्टा रद् करण्याची कार्यवाही करणे बाबत योग्य वेळी निर्णय घेण्यांत येईल.

कार्यवाही :- अधिक्षक अभियंता, (मंडल-ग्रा) नाशिक / प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, नाशिक.

**आयत्या वेळचे विषय :-**

१. मौजे लखमापूर शिवारातील रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करुन मिळणे बाबत मे.हेक्झागॉन न्यूट्रीशन प्रा.लि. गट नंबर ९२, उनंदा नगर, लखमापूर, ता. दिंडोरी, जि.नाशिक या घटकाचा अर्ज दिनांक ३०/०७/२००९.

सदर बाबतीत मा.अध्यक्षांनी सांगितले की, सदरचा अर्ज माझ्याकडे पाठवावा.

कार्यवाही :- जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक.

**२. सातपूर व अंबड एमआयडीसी क्षेत्रामध्ये २४ तास पाणी मिळणे बाबत.**

सदर बाबतीत सविस्तर चर्चेअंती मा.अध्यक्षांनी सांगितले की, प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, नाशिक यांनी याबाबत काय उपाय योजना करता येवू शकते याची पडताळणी करुन सद्यस्थिती अहवाल समितीकडे सादर करावा.

कार्यवाही :- प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, नाशिक.

**३.	एमआयडीसी सातपूर व अंबड क्षेत्रामधील मालमत्ता कर आकारणी बाबत मनपाकडून होत असलेल्या मोजणी बाबत.**

सदर बाबतीत मनपाच्या संबंधीत कर्मचा-याकडून होत असलेल्या त्रासा बाबत औद्योगिक संघटनांच्या प्रतिनिधींनी विषय उपस्थित केला असता मा. अध्यक्षांनी सांगितले की, उप आयुक्त (कर) मनपा, नाशिक यांनी सदर बाबतीत वैयक्तिक लक्ष देवून उपाय योजना करावी.

कार्यवाही :- उप आयुक्त (कर) मनपा, नाशिक.

शेवटी मानद सचिव, निमा यांनी जिल्हा उद्योग केंद्र व निमा यांचे वतीने मा.अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(डॉ. भास्कर.गो.पालवे)
महाव्यवस्थापक, जिउके व
सदस्य सचिव,
जिल्हा उद्योग मित्र समिती, नाशिक.

सही/-
(पी. वेलरासू)
जिल्हाधिकारी,
व अध्यक्ष,
जिल्हा उद्योग मित्र समिती नाशिक.

(स्थळ प्रतीवर मा.अध्यक्ष व सदस्य सचिव यांची स्वाक्षरी असे)